# आदिवासी व स्वराज्य

डॉ. अभय बंग

तरुण भारताचा व माझा विशेष ऋणानुबंध आहे. १७ वर्षांचा असतांना माझ्या जीवनातला पहिला वृत्तपत्रीय लेख मी लिहिला तो तरुण भारतात प्रकाशित झाला. त्यांनतर दहा वर्षे मी नियमीतपणे तरुण भारतासाठी लिहित होतो. नागपूरला मेडिकल कॉलेजमधे शिकत होतो, पण सोबतच लेखनाची पाठशाळा तरुण भारतात गिरवीत होतो. त्यामुळे तरुण भारताच्या गडचिरोली जिल्हा विशेषांकाच्या निमित्ताने आयोजित या कार्यक्रमाचा अध्यक्ष असलो तरी त्यापेक्षा अेक जुना अनुबंधी म्हणून अुपस्थित राहण्याचा मला विशेष आनंद आहे.

गेली ११ वर्षे मी व माझी पत्नी या गडचिरोली जिल्ह्यात राहतो आहोत. कधी इथल्या विकासातला सहभागी कार्यकर्ता म्हणून, तर कधी येथील जीवनाचा तटस्थ निरीक्षक म्हणून या जिल्ह्याचा अभ्यास करण्याची अकरा वर्ष मला संधी मिळाली. त्या आधारावर या जिल्ह्याच्या विकाससंबधी काही विचार आज मी मांडणार आहे. गडचिरोली जिल्हा व त्याचा विकास याविषयी काही लोकप्रिय भ्रम आहेत. त्यांचा विचार आज आपण करु.

भ्रम नंबर अेक : गडचिरोली जिल्हा हा आदिवासी जिल्हा आहे. जुन्या चंद्रपूर जिल्ह्यातील आदिवासी भागाचा नीट विकास होत नाही म्हणून १९८२ मधे आदिवासी भाग वेगळा करुन त्याचा गडचिरोली जिल्हा करण्यात आला. महाराष्ट्रात सर्वत्र गडचिरोली हा आदिवासी जिल्हा म्हणून ओळखला जातो. पण खरं तर जिल्ह्यातील केवळ ४० टक्के लोकसंख्या आदिवासी आहे, साठ टक्के गैरआदिवासी आहे. वैनगंगा नदीचं खोरं - वडसा, आरमोरी, गडचिरोली, चामोर्शी हे तालुके प्रामुख्याने गैरआदिवासी लोकसंख्येचे आहेत. इथे जंगल जवळपास नाही. विदर्भातील कुठल्याही इतर भागासारखाच हा भाग आहे. शेती हा मुख्य व्यवसाय आहे. येथील शेतकऱ्यांना शेतीला ओलीतासाठी पाणी हवे. युवकांना रोजगार, विशेषतः नोकऱ्या हव्यात. म्हणून धरण व कारखान्यांची वारंवार मागणी होते.

जिल्ह्याचा पूर्वेकडील, मध्यप्रदेशच्या सीमेला लागून असलेला भाग हा जंगलांनी झाकलेला आहे. जवळपास शंभर टक्के लोकसंख्या आदिवासी आहे. आदिवासींच्या गरजा व आकांक्षा वेगळ्या आहेत. त्यांना जंगल हवे, जंगलामधे मोकळा वावर हवा व त्यातून आवश्यक गोष्टी वापरण्याचा अधिकार हवा. बाह्य हस्तक्षेपाशिवाय, प्रभुत्वाशिवाय आपल्या पध्दतीने शांतपणे जगण्यासाठी त्यांना सुरक्षित कोपरा हवा. त्यांची गोंडी भाषा, त्यांचा वेश व त्यांची संस्कृती यांना बाहेरच्या लोकांनी हसू नये, तुच्छ लेखण्याचा अपमान करु नये, व त्यांच्या जगण्यावर आक्रमण करु नये एवढीच त्यांची माफक आकांक्षा व अपेक्षा आहे.

६० टक्के गैरआदिवासी व ४० टक्के आदिवासी यांची अेकत्र बांधलेली मोट ही गडचिरोली जिल्ह्याची मूलभूत समस्या आहे. जिल्ह्यातील विधानसभेच्या तिन्ही जागा, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षाची जागा या सर्व आदिवासींसाठी राखीव आहेत. त्यामुळे गैरआदिवासी राजकीय नेतृत्वाला निवडून यायला वाव नाही. आणि आदिवासी नेत्याला निवडून यायचं असल्यास बहुसंख्य असलेल्या गैरआदिवासी लोकसंख्येचा अनुनय केल्याखेरीज गत्यंतर नाही.

यामुळे, काही मोजके अपवाद सोडल्यास, प्रभावी राजकीय नेतृत्व जिल्ह्यातून समोर आलेच नाही. मग आदिवासींच्या आकांक्षांना कोण स्वर देणार ?

आदिवासींच्या विकासासाठी राज्यपालांनी नेमलेल्या अेक अुच्चस्तरीय समितीची वर्षातून अेकदा होणारी बैठक सुरु होती. मुख्यमंत्री या समितीचे अध्यक्ष! अुपमुख्यमंत्री, अन्य काही मंत्री, अनेक विभागांचे सचिव, व महाराष्ट्रातले पंधरा आदिवासी आमदार-खासदार या समितीचे सदस्य म्हणून अुपस्थित होते. कसा कुणास ठाअुक, मीही या समितीचा सदस्य आहे. बैठकीसमोर चर्चेला १० विषय होते. विषय पत्रिकेवर वरच्या क्रमांकांवर आश्रमशाळा, फुकट वाटप योजना यासारखे विषय होते. ९ व्या क्रमांकावरील विषय, महाराष्ट्राचा बजेटचा ७ टक्के भाग आदिवासी विकासासाठी खर्चिला जातो तो वाढवून १५ टक्के करावा, हा होता. दरवर्षी जवळपास ५०० कोटी रुपयांचा अधिक निधी आदिवासी विकासासाठी वळवण्याचा हा प्रस्ताव होता. १० व्या क्रमांकावर लोकसभेने गेल्यावर्षी पारित केलेला आदिवासी गावांना स्वशासनाचा अधिकार हा प्रस्ताव होता. अेका वर्षाच्या आत सर्व प्रांतांनी हा प्रस्ताव अंमलात आणण्याचे बंधन लोकसभेने घालून दिले आहे. हा प्रस्ताव अंमलात आल्यास आदिवासी गावांना ग्राम स्वराज्याचे अधिकार मिळतील. जंगल, जमीन, नैसर्गिक संपत्ती, कायदा व व्यवस्था राखण्याचे, दारुबंदी करण्याचे, विकासाच्या योजना स्वतः बनवण्याचे अधिकार मिळतील. आदिवासी भागात राजकीय व आर्थिक क्रांतीचाच हा प्रस्ताव आहे. बैठकीचा पूर्ण वेळ फुकट वाटपांची चर्चा करण्यात गेला. अमुक आश्रमशाळेत चपराशी नाही, तमुक गावात हँडपंप खराब, असलेच मुद्दे आदिवासी नेते मांडत राहिले. विषय पत्रिकेवरील सर्वात महत्वाचे, दुरगामी परिणामाचे शेवटले दोन मुद्दे चर्चेलाच आले नाहीत!

सर्वात महत्वाचे मुद्दे विषय पत्रिकेत सर्वात शेवटी असणे हा काही योगायोग नव्हता. पण ही फसवेगिरी लक्षात घेअून त्या मुद्यांवर चर्चा करण्याचा आग्रह धरण्याची चतुराई आदिवासी नेतृत्वाने दुर्दैवाने दाखवली नाही. मंत्री व नोकरशाहीच्या फसव्या डावाला ते बळी पडले. नव्हे ती फसवेगिरी त्यांच्या लक्षातच आली नाही. बैठक संपली!

अशा या निरागस आदिवासी नेतृत्वाला जेव्हा त्याच्या अस्तित्वासाठी गैरआदिवासींच्या बहुमतावर अवलंबून राहावं लागतं तेव्हा ते अजूनच हतबल होतं. मग आदिवासी जिल्ह्याच्या नावावर गैरआदिवासींच्याच गरजा व आकांक्षा पुढे रेटल्या जातात. मी अेक गैरआदिवासी आहे जो गडचिरोली जिल्ह्यात राहातो. मला प्रवासासाठी डांबरी रस्ते हवेत, वीज हवी, फोन हवे, फॅक्स सेवा हवी. मुंबई, दिल्ली किंवा परदेशात जाण्यासाठी मला विमानतळ देखील हवे. माझ्या गरजा व आकांक्षा वेगळ्या, आदिवासींच्या वेगळ्या. धरण, कारखाने या गैरआदिवासींच्या आकांक्षा आपल्या जागी पूर्णपणे वाजवी आहेत. फक्त त्या आदिवासींच्या आकांक्षा नाहीत. तरी देखील आदिवासी जिल्ह्याच्या नावाने त्या प्रचारित केल्या जातात. गडचिरोली जिल्ह्यात अेकही कारखाना नाही हा मुद्दा वारंवार मांडला जातो. हा कोणाच्या आकांक्षेचा मुद्दा आहे ? आदिवासींच्या नावाने आपल्या प्राथमिकता गैरआदिवासी मांडत आहेत. तेही बिचारे काय करणार ? तेही साठ टक्के आहेत! आदिवासी व गैरआदिवासींची अेकत्र बांधलेली मोट अेक दुर्दैवी कुतरओढ निर्माण करते. ही या जिल्ह्याच्या विकासाची निरगाठ आहे. गडचिरोली जिल्हा निर्माण करतांना विभाजनाची रेषाच चुकली! निव्वळ आदिवासी बहुल भागाचाच वेगळा

जिल्हा करायला हवा होता. आज ज्या गडचिरोलीच्या नावाने जिल्हा ओळखला जातो ते गडचिरोली गाव किंवा गडचिरोली तालुका हेच मुळी आदिवासी नाहीत. विभाजनाच्या चुकीचं हे सर्वात ठळक चिन्ह आपल्या डोळ्यासमोर आहे. जिल्ह्याचं बाळंतपण व बारसंच मुळात चुकलं!

भ्रम नंबर दोन – जंगल हा गडचिरोली जिल्ह्याच्या विकासातील सर्वात मोठा अडथळा आहे !

रस्ते, धरण, कारखाने, खाणी, विजेची किंवा टेलिफोनची लाइन कोणताही विकासाचा प्रकल्प करायचा असला की जिल्ह्यात सर्वात मोठी अडचण समोर येते जंगल संरक्षण कायद्याची. जंगल साफ केल्याशिवाय प्रकल्प करता येत नाहीत, पण या कायद्यामुळे जंगलाला हात काही लावता येत नाही. स्वाभाविकतः लोकांना, नेत्यांना व नोकरशाहीला देखील अशीच भावना होते की जंगल हे विकासातील अडसर आहेत. हा दुसरा मोठा भ्रम आहे.

भ्रम यासाठी की जंगल हे या जिल्ह्याचं सर्वात मोठं भांडवल आहे. कागदावर ८० टक्के व प्रत्याक्षात जवळपास ६० टक्के जमीन दाट जंगलाखाली आहे. भारतातील अुरल्या सुरल्या शेवटच्या जंगलामधे इथली जंगलं गणली जातात. त्यांच पर्यावरणीय अमूल्य मूल्य बाजूला ठेवलं तरी निव्वळ बाजार भावाने विचार केल्यास साग, बांबू व तेंदुपत्ता या तीन प्रमुख वनोपजपासून वर्षाला १०० कोटी रुपयांचचं अुत्पन्न निर्माण होतं. जंगलाचं हे एवढं मोठं भांडवल व अुत्पन्न असूनही लोकांना जंगल संपत्ती वाटत नाही, अडथळा वाटतो, कारण हे भांडवल व अुत्पन्न त्यांचचं नाही. तीन बाह्य शक्तींचा या संपत्तीवर कब्जा आहे. पहिली शक्ती – सरकार! या जंगलांची संपूर्ण मालकी सरकारची. एकोणीसाव्या शतकात इंग्रजांनी स्वतःच्या फायद्यासाठी सर्व जंगलाची मालकी सरकारी केली व लेखणीच्या एका फटक्यात जंगलात राहणाऱ्या सर्व लोकांना कफल्लक बनवलं. ५० वर्षांपूर्वी आपलं सरकार आलं तरी तिने हे भांडवल लोकांना परत केलं नाही. सरकारच सावकार बनली, व आदिवासी भिकारी बनला. गडचिरोली जिल्ह्याचे अेक आदिवासी फागोजी व ी यांच्या शब्दात जंगलाच्या सरकारीकरणाचा परिणाम अैका ...........

जंगल सरकारी, जमीन सरकारी, इलेक्ट्री सरकारी, सडक सरकारी, तालाब सरकारी, कुआँ सरकारी, चाँपाकल सरकारी। और तो और सूअर सरकारी... सो खेत खाय तो खाने दो ... आखिर सरकारी ठहरा। सभी सरकारी खाते हैं, वह भी खा रहा है। हाँ, और जंगल में शेर भी सरकारी, बैल खा जाय तो खा लेने देना, मारना मत कौन जाने सरकार क्या सोचे, कौन सी मुसीबत आ जाय ? सूअर मत मारो, शेर मत मारो, मारो तो फिर क्या मारो ? सरकार कहती है मारो तो चूहा मारो, मच्छर मारो ... जितना चाहे अुतना मारो, जी भर कर मारों हाथ से मारो, टंगिया से मारो, तीर चलाओ, बन्दूक चलावे। मगर हाँ, तीर कमान या टंगिया लेकर जंगलमें मत जाना। वहाँ सब सरकारी जानवर, टंगिया देखकर डर ना जाय! हाँ गोंडमन, अेक बात और सुन लो। धरती के भीतर पत्थर भी सरकारी, सो जमीन मत खोदना बिना सरकार से पूछे मरने के पहले अप्लीकेशन लगा देना कबर खोदने की, नहीं तो वहाँ भी नही छूटेगा पीछा सरकारी का। यही तो हमारी जिंदगी है भाईझन। आगे सरकारी,

पीछे सरकारी, अुपर सरकारी, नीचे सरकारी... जो देखो सो सरकारी ही सरकारी, रह गया बस खाली हाथ आदिवासी और बन गया असली मालिक भिखारी!”

हे अरण्य रुदन करत फागोजी व ी चार वर्षांपूर्वी मरुन गेले.

जंगलाच्या या विराट भांडवलाचा फायदा घेणारी दुसरी शक्ती - बल्लारपूर पेपर मिल, जिला गेली ५० वर्षे इथला अमाप बांबू - वर्षाला जवळपास वीस कोटी बांबूचे नग - बाजारभावापेक्षा षष्ठांश किंमतीत मिळतो. जिल्ह्यात निवास आदिवासींचा, विकास मात्र पेपरमिलचा! तिसरी शक्ती आहे जंगल ठेकेदार, तेंदुपत्ता व लाकडाचे ठेकेदार. जंगलमालाच्या विक्रीपासून सरकारला रॉयल्टी मिळते, ठेकेदाराला नफा मिळतो, नोकरशाहीला लाच मिळते, नक्षलवाद्यांना देखील खंडणी मिळते! जंगलातल्या आदिवासीला काय मिळते ? तो निव्वळ मजूर आहे. मजुराला संपत्तीच्या रक्षणात रस कधी पाहिला आहे का ? जंगलावर सरकारने ताबा ठेवून जंगलासोबतचं येथील लोकांचं आई-मुलाचं नातं विकृत करुन ते मजुराचं करुन टाकलं आहे. त्यामुळे येथील जनतेला जंगल हे स्वतःची संपत्ती न वाटता इतरांच्या घशात जाणारी संपत्ती वाटते, अुघड्या डोळ्यांनी बघावी लागते, नव्हे त्यात मजुर म्हणून हातभार लावावा लागतो. मग जंगल हे विकासातील अडथळा वाटल्यास काय नवल ?

हे कसं बदलता येईल ?  आज जंगलाचं अुत्पन्न मुंबई सरकारकडे जातं. ते सरकार त्या वन अुत्पन्नापैकी ५ टक्के विकास निधी म्हणून गडचिरोली जिल्हा परिषदेला परत देतं. ही एवढीशी परतफेड देखील नोकरशाही व नेतेशाहीच्या अनेक गळक्या पाईपमधून लोकांपर्यंत पोहोचता पोहोचता दोनचार कण पोहचतात. लोकांचं पोट भरत नाही. ते जंगल तोडून त्या जागी आपली शेती प्रस्थापित करण्यातच स्वतःचं हित मानतात. शासनाच्या स्वार्थी धोरणाने लोकांना चोर बनण्यासाठी मजबूर केलं आहे.

जंगलापासून बाजारभावाने मिळू शकणारं वार्षिक १०० कोटी रुपयांचचं अुत्पन्न, या जंगलात वसलेल्या जवळपास अेक हजार आदिवासी गावांना दिल्यास प्रत्येक गावाला वार्षिक १० लक्ष रुपये अुत्पन्न मिळेल. ही आदिवासी गावं छोटी छोटी, सरासरी ३०० लोकसंख्येची आहेत. या अुत्पन्नातून आपल्या मर्जीने विकास व कल्याणाचे स्वातंत्र्य त्यांना मिळालं तर ते स्वतःचं कल्याण नक्कीच अधिक चांगलं करतील, व शिवाय जंगलाचं जिवापाड रक्षणही करतील. जंगल म्हणजे काय व आदिवासींना स्वतःला काय हवं ते मुंबई सरकारपेक्षा त्यांना अधिक चांगलं कळतं. नमूना म्हणून अेक सत्य अुदाहरण सांगतो.

जवळपास ४० वर्षांपूर्वी, तत्कालीन मुंबई प्रांत सरकारने अेक शासकीय आदेश मंत्रालयातून काढला, आदिवासी मोहफुलांचा अुपयोग दारु बनवण्यासाठी करतात म्हणून जंगलातली मोहाची झाडं तोडून टाकावीत. मोहाचं झाड हे आदिवासींच कल्पवृक्ष आहे, नारळासारखं! त्याचे अनेक अुपयोग आहेत. त्याला आदिवासी पवित्र वृक्ष मानतात, कधीच तोडत नाहीत. ती झाड कापून टाकावी! पण या शिवाय गंमत म्हणजे त्याच शासकीय आदेशात जंगलातील काही झाडांचं संरक्षण, संवर्धन करावं असा निर्देश होता. त्यातील अेक झाड लिहिलं होतं टोळाचं! मोहाच्या झाडाच्या फळालाच टोळ म्हणतात! पण मुंबई सरकार म्हणत होतं, मोहाचं झाड तोडा, टोळाचं वाढवा!

जंगल राखण्याचे व त्याचं अुत्पन्न स्वतःच्या विकासासाठी वापरण्याचे स्वातंत्र्य या जिल्ह्यातील जनतेला मिळाल्यास त्यांना जंगल हे दुसऱ्याची संपत्ती व आपल्या विकासातील अडथळा वाटणार नाहीत. तोपर्यंत हा समज कायमच राहील.

भ्रम नंबर तीन : महाराष्ट्रातील जंगलाचा समतोल राखण्याची जबाबदारी गडचिरोली जिल्ह्याची आहे.

संपूर्ण महाराष्ट्राने जंगल सफाया करुन तिथे शेती, धरण, कारखाने केले, स्वतःचा विकास केला, व पर्यावरणाच्या संतुलनासाठी जंगल राखून ठेवण्याची जबाबदारी मात्र आमच्या माथी मारली. त्यामुळे इथल्या जंगलाला हात लावता येत नाही. ही या जिल्ह्यातील जनतेची भावना आहे. अुर्वरित महाराष्ट्राने विकास करावा, व त्यासाठी इथल्या जनतेने जंगल सांभाळावे अशी ही विषम विभागणी आहे. ती येथील जनतेला खुपते. ही जबाबदारी संपूर्ण महाराष्ट्राने समप्रमाणात अुचलणं आवश्यक आहे. हे कसं करता येईल ? कारखान्यातून निर्माण होणारं प्रदूषण नियंत्रण ही त्या त्या कारखान्यांची जबाबदारी कायद्याने मानली आहे. त्यासाठी न्यायालयीन हस्तक्षेप होतो आहे. त्याच न्यायाने शेतीसाठी पाणी, चारा, लाकूड यासाठी आवश्यक जंगल निर्मितीची जबाबदारी शेतीशीच जोडली पाहिजे. प्रत्येक शेतकऱ्याने १० टक्के शेतीवर वृक्ष, जंगल वाढवणे आवश्यक करावे. ते आर्थिक दृष्टीने फायदेशीर आहे. प्रत्येक गावाने, जिल्ह्याने किमान १० टक्के जमीन जंगलाखाली आणावी. शेत तिथे शेत-तळं व शेत-जंगल हे सूत्र बनवल्यास जंगल राखण्याची जबाबदारी विकेंद्रित होईल.

याप्रमाणे जंगल राखण्याची जबाबदारी महाराष्ट्रभर सर्वांवर समान वाटल्यास गडचिरोलीवर त्याचं ओझं पडणार नाही. त्या जंगलापासून मिळणाऱ्या अुत्पन्नावर येथील जनतेला अधिकार दिल्यास ते जंगल ओझं वाटणार नाही. पैशाच्या थैलीचं कुणाला ओझं वाटतं का ? हां, बैलाच्या पाठीवर पैशाची गोणी लादल्यास त्याच्याकडे नुसता भार वाहण्याचा वाटा आल्याने त्याला ते ओझं वाटतं व ते ओझं फेकून देण्यातच त्याला मुक्ती वाटते. अुर्वरित महाराष्ट्राने आज गडचिरोली जिल्ह्याला ओझ्याचा बैल बनवला आहे. या जंगलाची मालकी जनतेला द्या, मग ते ओझं वाटणार नाही, संपत्ती वाटेल!

भ्रम नंबर चार : शिक्षणाद्वारे आदिवासींचा विकास होईल.

महाराष्ट्रातील आदिवासींच्या कल्याणासाठी गेल्या ४० वर्षात जवळपास २० हजार कोटी रुपयांचा खर्च करुनही त्यांचा विकास झाला नाही ही काही आश्चर्यजनक बाब नाही. शासनाने निव्वळ साधन-संपत्ती व सबसिडी वाटली. पण ती खिरापत झेलण्याची, व अुपयोग करण्याची क्षमता आदिवासींमधे नव्हती म्हणून खिरापत भलतीकडेच गेली. खिरापत वाटणाराच मुख्य प्रसाद खाअून गेला. मानवीय क्षमतांचा विकास केल्याखेरीज आदिवासींचा विकास होणार नाही या कल्पनेतून शिक्षणाचं महत्व आलं. शिक्षण म्हणजे शाळा-कॉलेजेस असा अर्थ लावून आश्रमशाळा, व शासकीय-गैरशासकीय शिक्षण संस्था अुघडण्यात आल्या. गडचिरोली जिल्ह्यातील जवळपास १ लक्ष मुलं-मुली आज यात शिक्षण घेतात. याद्वारे आदिवासींचा विकास होईल हा तिसरा भ्रम आहे.

आदिवासी मुला-मुलींनी देण्यात येणाऱ्या शिक्षणाची प्रत इतकी खराब आहे की सातवीत गेलेल्या मुलाला साधं मराठी वाचता येत नाही असंही मी पाहिलं आहे. म्हणून बहुतेक विद्यार्थी, ते पूर्वीच गळले नाहीत तर, दहावीत नापास होतात. आणि त्यांच्या दुर्दैवाने पास झालेच तर ते कुचकामी सर्टिफिकेट घेऊन शहरांमधे नोकरी मिळवण्याच्या बेरोजगारांच्या क्यू मधे शेवटी अुभे राहतात. आदिवासी भागाबाहेरील समाजाला स्वस्त कामगार-चपराशी-कारकून पुरवणे हा या आदिवासी शिक्षणाचा अुद्देश्य आहे का ? तेच आज घडतं आहे. शिक्षण घेतलेला आदिवासी त्याच्या संस्कृतीपासून व गावापासून तुटतो, दूर पळू इच्छितो.

काही वर्षांपूर्वी आमच्या आदिवासी रुग्णालयात आदिवासीच मुलीच नर्सेस असाव्यात असा विचार मनात आला म्हणून मॅट्रिक पास आदिवासी मुलींना मुलाखतीला बोलवलं. प्रशिक्षणानंतर नर्स बनून त्यांनी आमच्यासोबत आदिवासींसाठी काम करावं ही आमची अपेक्षा. त्यांना विचारलं,

तुम्हाला गोंडी बोलता येते का ?
नाही.
तुम्ही गोटुलमधे आदिवासी नृत्य केलं का ?
नाही.
निदान तुम्ही कधी मोह वेचला, तेंदुपत्ता तोडाईला गेल्या का ?
“नाही!”

मग या मुलींना आदिवासी का म्हणायचं ? वरुन त्यांचा प्रश्न, तुमच्याकडे शिक्षण घेतल्यावर आम्हाला शहरात सरकारी नोकरीला जाता येईल का ?

शिक्षणाचा हा असा प्रभाव आहे. शिक्षण घेतलेला आदिवासी हा आदिवासी अुरत नाही, तो त्याच्या समाजात परत जाअू इच्छित नाही. तो शहरातील नोकरीच्या रांगेत अुभा राहतो. शिक्षणातून विकासाचा हा मार्ग आहे का ?

समस्या एवढ्यावर थांबत नाही. आदिवासी कल्याणाच्या सरकारी कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी मोठ्या प्रमाणात कर्मचारी वर्ग पाहिजे. हे कुठून आणायचे ? मग गैरआदिवासी भागातले अनिच्छुक सुशिक्षित युवक-युवती शिक्षक म्हणून, पटवारी म्हणून, पोलीस म्हणून, डॉक्टर, नर्सेस म्हणून जबर्दस्तीने इथे पाठवले जातात. ते रुजू होत नाहीत, गैरहजर राहतात, शिव्या शाप देत काम करतात. त्यांना भाषा, संस्कृती समजत नाही, आदिवासींसोबत आपलेपणा वाटत नाही. त्यांचंही आयुष्य दुःखी बनतं, त्यांच्या मार्फत आदिवासींचं कल्याण होत नाही ते नाहीच!

काय साधलं आम्ही ? आदिवासीला शिक्षण देअून गैरआदिवासी बनवलं व नोकरीसाठी शहराकडे वळवलं. शहरातल्या गैरआदिवासीला नोकरीच्या मजबूरीपायी आदिवासी भागात पाठवलं. दोन्ही तऱ्हेने माणसं वाया घालवली. मानव संसाधन नियोजन कसं नसावं याचा हा अुत्कृष्ट नमूना आहे.

मग आदिवासींना शिक्षण कशा प्रकारचं असावं ? अेकतर शालेय शिक्षणापेक्षा फार मोठ्या प्रमाणात शाळेबाहेरचं संस्कार शिक्षण, प्रौढशिक्षण व लोकशिक्षण हवं. वैज्ञानिक

दृष्टिकोन, अंधश्रध्दा निर्मूलन, व विकासाच्या योजनांचा कसा अुपयोग करुन घ्यावा याचं शिक्षण हवं. दुसरं, शाळा कॉलेजेस मधील शहरी - पुस्तकी शिक्षणाअैवजी (अुदा. सायबेरियाचा भूगोल किंवा इंग्लंडचा इतिहास शिकण्याअैवजी) आपल्या गावाच्या गरजा पूर्ण करण्याचं व्यावसायिक शिक्षण तिथे देण्यात यावं. जंगल कसं वाढवावं, भातशेती कशी करावी, पशुपालन, कुकुटपालन कसं करावं, जंगलातल्या वनोपजपासून वस्तूंच अुत्पादन कसं करावं, सायकल दुरुस्ती, हँडपंप दुरुस्ती, गावाचा आरोग्य कार्यकर्ता, पाणलोट विकास कार्यकर्ता, आदिवासी समाजाच्या अनेक गरजा पूर्ण करणारे कार्यकर्ते यातून शिक्षित व्हावेत. ते स्वतःचा व्यवसाय करतील किंवा गाव पातळीवरचे आदिवासी विकास कर्मचारी बनतील. या मानव शक्तीला शिक्षणच मुळी असं द्यावं की ते अुपजीविकेसाठी स्वतःच्या गावाकडे वळतील. त्यात आदिवासी गावांची गरज पूर्ण होईल, शासनाला इच्छुक व सक्षम कर्मचारी मिळतील, व त्या युवक-युवतींनाही कामधंदा मिळेल. हे जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत सध्याच्या शिक्षण प्रणालीतून आदिवासींचा विकास होण्याअैवजी ब्रेन ड्रेन व बेरोजगारीच वाढेल.

भ्रम नंबर पाच : हॉस्पीटल, डॉक्टर, नर्सेस यांच्या मार्फत आदिवासींचं आरोग्य सुधरेल.

मेळघाटच्या कुपोषणावर अुपाय म्हणून हायकोर्टाने अेक योजना आदेशरुपाने महाराष्ट्र सरकारला दिली आहे. चिखलदरा व धारणीला दोन अद्यावत रुग्णालय बांधणे, सर्व आदिवासी मुलांची बालरोग तज्ञांद्वारे तपासणी व अुपचार इत्यादी गोष्टींवर त्यात भर आहे. मेडिकल कॉलेजेसमधून डॉक्टरांचे फिरते चमू पाठवून त्यांच्यामार्फत आदिवासी मधले बालमृत्यू कमी करण्याचे युध्द पातळीवर प्रयत्न सुरु आहेत.

अकरा वर्षे आदिवासींमधे वैद्यकीय सेवा व संशोधनाचे काम केल्यामुळे व सामूदायिक आरोग्याचे काही प्रयोग केल्यामुळे मला जर थोडासा अनुभव व अधिकार प्राप्त असेल तर त्याआधारे मी अुच्चखाने सांगू इच्छितो की हे शासकीय प्रयत्न अनाठायी व हास्यास्पद आहेत. या अनिच्छुक, शहरी, फिरत्या तज्ञांद्वारे कुपोषण व बालमृत्यू कमी करता येणार नाहीत. त्यांची गरजही नाही. चीन ने बेअर फूट डॉक्टर मार्फत आपल्या विराट पसरलेल्या जनतेचं आरोग्य सांभाळलं. गडचिरोली जिल्ह्यात १९८८ मधे ५० गावात आम्ही काम सुरु केलं तेव्हा त्या गावांमधला अर्भकमृत्यू दर होता १२०. प्रत्येक गावातील निरक्षर सुइणी व अेक साक्षर ग्राम आरोग्य कार्यकर्ता प्रशिक्षित करुन त्यांच्या मार्फत गावातच आरोग्यसेवा देण्याचा मार्ग आम्ही स्वीकारला. कोणतंच मोफत अन्न वाटप, कपडे वाटप किंवा बालरोग तज्ञांचे फिरते चमू इथे अुपयोगात आणले नाहीत. प्रत्येक आदिवासी गावातूनच आरोग्य कार्यकर्ते निर्माण करा (बाहेरुन नेमणूका करु नका), त्यांना औषध द्या, सतत मार्गदर्शन द्या, व लोकांना मोठ्या प्रमाणात आरोग्याविषयी माहिती द्या! लोक स्वतःच आपल्या बालकांना वाचवायला धडपड करायला लागतात. आज या ५० गावातला अर्भकमृत्यू दर ४० वर आला आहे. (महाराष्ट्राचा सरासरी अर्भकमृत्यू दर सध्या ६० आहे.)

भ्रम नंबर सहा : गडचिरोली जिल्ह्यात दारुबंदी आहे.

दारुमुळे होणाऱ्या प्रचंड आर्थिक व कौटुंबिक नुकसानामुळे १९८८ ते ९३, पाच वर्षे व्यापक दारुमुक्ती आंदोलन इथे झालं. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने दारुबंदी लागू केली. पण दारु

दुकाने बंद करण्याखेरीज अजून काहीच केलं नाही. दारुबंदीच्या अंमलबजावणीचे कोणतेच प्रयत्न केले नाहीत, अुलट गावोगावी अुभ्या झालेल्या दारुमुक्ती समित्यांच्या सक्रिय युवक व महिलांना पोलीसांनी पीडून काढलं. गावातील दारु बंद ठेवण्याचे अधिकार आम्हास द्या असं गावांनी वारंवार सांगूनही तो अधिकार पोलीसांनी स्वतःकडेच राखून ठेवला (कां ? हे सांगायला पाहिजे का ?) शिवाय आदिवासीला स्वतःच्या अुपयोगासाठी दारु गाळण्याचे अधिकार शासनाने बहाल केले. परिणामतः जिल्ह्यात कागदावर दारुबंदी असूनही अनेक प्रकारे दारु सुरु आहे.

पण दारुबंदी अयशस्वी झाली असा निश्कर्ष अजून दुसरा भ्रम ठरेल. दारुबंदी होण्यापूर्वी वर्षाला २० कोटी रुपयांची दारु कायदेशीर-बेकायदेशीर रीत्या जिल्ह्यात खपत होती. आज ती आठ कोटी रुपयांवर आली आहे. दर वर्षाला १२ कोटी रुपये सरळ लोकांच्या घरात वाचतात. कोणत्याही अेका शासकीय विकास योजनेपेक्षा हा फायदा मोठा आहे. पण जनतेला पुरेसं समाधान नाही. ही आठ कोटीची दारुही कां खपावी ? तीही बंद व्हावी. तरच ही खरी दारुमुक्ती होईल.

मानवीय विकास ही आदिवासी विकासाची किल्ली आहे हे आपण पाहिलं. दारुच्या धुंदीत असलेल्या आदिवासीचा कसला आला आहे मानवीय विकास किंवा आर्थिक विकास? आज जागतिक बँक (रिपोर्ट नंबर ३१७) जाहीरपणे म्हणते आहे की अविकसित देशांचं मुख्य भांडवल मानवीय भांडवल आहे. त्याचा विकास करायचा असेल तर या देशांनी दारु नियंत्रण केलं पाहिजे. ते केलं नाही तर ? मेक्सिकोतील १३ टक्के पुरुष दारुचे व्यसनी आहेत. गडचिरोली जिल्ह्यात ८००० दारुचे व्यसनी आहेत. दारु नियंत्रण व व्यसनमुक्ती शिवाय मानवीय विकास शक्य नाही, आदिवासी विकास शक्य नाही.

शहरांमधील पंचतारांकित हॉटेलमध्ये, क्लबमधे, किंवा सुशिक्षित घरांतील ड्राईंगरुम मधे ज्याप्रकारे दारु पिण्याची फॅशन आहे त्यावरुन शहरी लोकांनी दारुविषयी आपल्या कल्पना बनवू नयेत. त्यांनी ठाणे जिल्ह्यातील किंवा मेळघाट मधील आदिवासी गावात जाअून बघावं की कसं पूर्ण गाव - पुरुष व स्त्रिया - दारु पिअून बेहोष असतं, व घराघरातून विद्रूप किंकाळ्या, भांडणं, शिव्या अैकू येत असतात. तिथे जाअून त्यांनी अेक रात्र राहून बघावं. दारुविषयी त्यांची मते आमूलाग्र बदलतील.

शेवटचा भ्रम : आदिवासी संस्कृतीचं जतन म्हणजे त्यांना कायमचं मागासलेलं ठेवायचं आहे.

आदिवासींच्या या मागासलेल्या जीवनशैलीचं, संस्कृतीचं जतन कशासाठी ? त्यांना काय कायमचं मागासलेलं ठेवायचं आहे ? त्यांना सुधरु द्या, मुख्य प्रवाहात येअू द्या. हा वारंवार अैकायला येणारा तर्क.

सुधारणा म्हणजे काय, विकास म्हणजे काय यांच्या प्रत्येक समाजाच्या अवधारणा आहेत. त्या त्या बाळगण्याचा त्यांना अधिकार व स्वातंत्र्य आहे. गैरआदिवासी समाजाला कारखाने, धरणं, व मोटर गाड्या हव्यात. त्या त्यांच्या गरजा योग्य की अयोग्य हा निकाल कुणी अन्य देअू नये. तसंच आदिवासींना काय हवं, कोणत्या दिशेने विकास हवा हा निर्णय कुणी अन्य घेअू नये. विकासाच्या बाह्य कल्पना त्यांच्यावर लादू नयेत. हा मानवीय अधिकाराचा, स्वातंत्र्याचा मूलभूत प्रश्न आहे. ब्रिटिश पार्लिआमेन्टमधे हेल्वेहेटियसचं प्रसिध्द वाक्य ठळकपणे लिहून ठेवलं

आहे - तुझी मते मला पटत नाहीत. त्यांचा मी तिरस्कार करतो. पण ती मांडण्याच्या व त्यानुसार जगण्याच्या तुझ्या अधिकाराचं रक्षण करण्यासाठी मी प्राणपणाने लढेन!" लोकशाही स्वातंत्र्याचा हा गाभा आहे. आदिवासींना त्यांचचं जीवन कसं असावं हे ठरवण्याचं स्वातंत्र्य आहे की नाही ? की मुंबईच्या सचिवालयातून गडचिरोलीच्या विकासाची दिशा ठरणार ?

याशिवाय संपूर्ण गैरआदिवासी समाजाचंही हित या प्रश्नासोबत जुळलेलं आहे. कसं ? फक्त दोनच तर्क आज मांडतो. औद्योगिक अुत्पादन पध्दती व चंगळवादी भोक्ता संस्कृती यासाठी तुटणारी जंगलं व नष्ट होणारा निसर्ग यामुळे आफ्रिका खंडाचं वाळवंट होत आहे. आफ्रिकेतील जंगलं व आदिवासी जमातींना गिळत सहारा वाळवंट रोज दक्षिणेकडे पुढे सरकतो आहे. अुत्तरेकडील-युरोप, अमेरिका, अरब देशांमधील लोकांना याची तमा नाही. ते अुत्तरेकडे सुरक्षित आहेत. वाळवंट दक्षिणेकडे सरकतं आहे. पण कवी त्यांना इषारा देतो आहे.

Sahara is creeping,
Southwards and Southwards.
Don't laugh, O fools in the North!
The Earth is round !!

अुत्तरेकडील बेसावध मूर्खांनो, हसू नका! पृथ्वी गोल आहे. दक्षिणेकडे सरकत सरकत हे वाळवंट शेवटी पृथ्वीला वळसा घेअून अुत्तरेला तुमच्यापर्यंत पोहचणारच!

गैरआदिवासी सभ्यतेचा अजून अेक स्वार्थ आदिवासी संस्कृतीच्या रक्षणासोबत जुळलेला आहे.

सॅम्युअल हटिंग्टन यालेखकाचं Conflict of Civilisations हे पुस्तक सध्या जगात गाजत आहे. तो काय म्हणतो ? भांडवलशाही व साम्यवाद यातील शीतयुध्द संपलं. आता जगात सर्वत्र अेकच अर्थव्यवस्था - भांडवलशाही, व अेकच राज्यव्यवस्था - लोकशाही राज्य करणार. जागतिकीकरणाच्या नव्या युगात सर्वच देश याबाबतीत सारखेच होणार. विज्ञान सर्वत्र अुपलब्ध होणार. मग आता यानंतर स्पर्धेत कोणता देश पुढे जाणार व कोणता मागे राहणार हे कशावर निर्भर करणार ? हटिंग्टन म्हणतो - ते आता संस्कृतीवर निर्भर करणार. अमेरिका व जपान दोघांचीही अर्थ व राज्य प्रणाली सारखी झाल्यावर जपान पुढे का जात आहे ? तिथल्या संस्कृतीच्या विशेषतेमुळे, लोकांची मनोवृत्ती, चमूने काम करण्याची सवय यामुळे! जग संहारक अेड्स सर्वत्र पसरत असतांना तो अरब राष्ट्रांमध्ये फार कमी का ? लैंगिक संबंधांबाबत सांस्कृतिक निर्बंधामुळे. प्रगतीची प्रमुख निर्णायक आता संस्कृती असणार!

म्हणजेच सांस्कृतिक वैविध्य हे अतिशय महत्वाचं ठरणार. जैविक वैविध्य (bio-diversity) सांभाळून ठेवण्याची वैज्ञानिकांची आज धडपड आहे. कोणतीही प्राणीजात किंवा वनस्पती पृथ्वीतलावरुन नष्ट होअू नये. का ? कारण प्रत्येक सजीव प्रजातीमधे निसर्गाच्या काही जैविक विशेषता आहेत. अुत्क्रांतीच्या दरम्यान लाखो वर्षात त्या विशेषता निर्माण झाल्या, टिकल्या. मानवाच्या भविष्य काळातील अनेक समस्यांची अुत्तरं त्या जैविक वैविध्याच्या खजिन्यात दडलेली असू शकतात. ती संपली तर मानवजात त्यांना कायमची मुकणार.

मग सांस्कृतिक वैविध्य तर अुत्क्रांतीमधील या पेक्षाही प्रगत, पुढचं पाअुल आहे. आणि ते नष्टही अधिक झपाट्याने होतं, कारण ते फार तरल असतं. जगभरातली सांस्कृतिक विशेषता

व वैविध्य हे प्रचंड मोठं भंडार आहे. या वैविध्यामधेच प्रगतीची चाबी आणि अनेक समस्यांची अुत्तर लपलेली आहेत. म्हणून आदिवासी संस्कृतीच्या विशेषतांचं जतन करुन ठेवणं आवश्यक आहे. आधुनिक माणसाला यापुढे आदिवासी संस्कृतीची गरज खरंच पडणार आहे का ?

आज स्पर्धेच युग आहे. क्रूर स्पर्धा! प्रत्येकाला पुढे जायचं आहे. स्पर्धा म्हटली की इतर सर्व स्पर्धक ठरले. जीवनातील सर्व नाती स्पर्धकांची व यश हे अंतिम फलित असं नक्की झाल्यावर अेक जीवघेणी दौड, रेस सुरु होते. आजचं जीवन असं झालं आहे. प्रत्येकाला धावणं भाग आहे. त्यालाच प्रगती म्हणतात.

कुत्र्याच्या राज्यातील अेक आदरणीय कुत्रा अेकदा कलकत्याहून दिल्ली पदयात्रेवर निघाला. त्यांच्या अनुयायांनी समारोहपूर्वक कलकत्याला निरोप दिला. मजल दरमजल करीत तीन महिन्यांनी दिल्लीला तो पोचणार होता. दिल्लीतले त्याचे अनुयायी भव्य स्वागत करणार होते. पण आश्चर्य! सातव्याच दिवशी तो कुत्रा दिल्लीला पोहचला! अनुयायांनी जयघोष केला. महाराज तुम्ही खरंच महान! इतक्या गतीने फक्त तुम्हीच प्रवास करु शकता!" "नाही रे बाबांनो!" धापा टाकत व रक्त गाळत तो कुत्रा म्हणाला "मी माझ्या मर्जीने नाही असा धावलो. पहिल्या गावात पोहचलो की तिथले कुत्रे माझ्या मागे धावले. जीव वाचवत मी पळत सुटलो. दुसऱ्या गावी पोहचलो तर तिथले कुत्रे तुटून पडले. मला कुठेच कुणी अेक क्षण आराम करु दिला नाही. म्हणून मी इतक्या लवकर दिल्लीला पोहचलो!" महाराजांचं हे स्पष्टीकरण जयघोषामधे बुडवून टाकत अनुयायांनी भव्य मिरवणूक काढली. यशाचे हार तुरे घातले. आजच्या स्पर्धेतील यश हे असं आहे. मला असं कळलं की दुसऱ्या दिवशी तो कुत्रा हार्टअटॅकने मेला.

अनियंत्रित स्पर्धेच्या युगात आपण सर्वच असे मजबूर धावत असतांना जेव्हा थकून जाअू, छातीत वेदना व्हायला लागतील, तेव्हा धापा टाकत मरणाच्या आकांताने आपण यावर अुपाय शोधू. तेव्हा आदिवासी संस्कृतीत आपल्याला याचा अुपाय सापडेल.

अेक यशस्वी अुद्योगपती अेकदा सुटी घालवण्यासाठी शहरातून जंगलात गेला. मोटारीने फिरतांना त्याला अेका झऱ्याकिनारी झाडाखाली अेक आदिवासी पहुडलेला आढळता. त्याला तो म्हणाला "अरे अुठ! आळशासारखा काय पडून आहेस ?

अुठून काय करु ?

"काही काम कर!"

त्याने काय होईल ?

"तुला भरपूर पैसा मिळेल!"

त्यामुळे काय फायदा ?

तुला माझ्यासारखी मोटार विकत घेता येईल.

त्याने काय फायदा ?

"तुला सुटी घेअून निसर्गरम्य ठिकाणी जाअून छान रिलॅक्स होता येईल!"

"मग तेच तर मी आत्ता करतो आहे!"

समाधान कशात आहे ? सर्व पळापळ कशासाठी ? जसं याचं सोपं अुत्तर आदिवासीकडे आहे, तसंच इतरांसोबत स्पर्धक न बनता सहयोगी नात्याने कसं जगावं याचं तंत्र पण त्यांच्याकडे आहे. दरवर्षी मार्च, अेप्रिल, मे या महिन्यांत गडचिरोलीच्या अरण्यात प्रचंड प्रमाणात मोहाची फुलं गळतात. ती वेचून आदिवासी वर्षभराची बेगमी करतो. तो त्यांचा अन्नाचा साठा आहे. तेंदूपत्ता फुटतो. तो तोडून आदिवासी वर्षभराची कमाई करतो. हे सर्व मोठं धन जंगलात विखुरलेलं असतं. दोन लाख आदिवासी अहोरात्र हे धन वेचत असतात. मी व माझी पत्नी राणी रोज जंगलात जातो तेव्हा हे आम्ही केवळ बघत असतो. पण आजवर कधीही हे धन वेचणाऱ्या आदिवासींमधे भांडण झालेलं आम्ही पाहलं नाही. जंगलात विखुरलेली मोहफुलं व तेंदूपत्ता कोणी कुठे वेचावा व कसा वाटून घ्यावा याची त्यांची पारंपारिक पध्दत आहे. ती त्यांना अेकमेकांसोबत सहयोगी पध्दतीने जगायला शिकवते. शेजारी अुपाशी असेल, त्याच्या घरी अन्न नसेल तर मी जेवण करणं तिथे पाप मानलं जातं. मला जेवायचं असेल तर शेजाऱ्यास अन्न देअूनच मी जेवू शकतो. हे सांस्कृतिक नातं!

आदिवासी संस्कृतीच्या या हिरामोत्यांची आपल्याला आज ना अुद्या गरज पडणार आहे. त्यासाठी का होईना, आदिवासी संस्कृतीला नष्ट होअू देवू नका! ही माणसं भोळी आहेत, प्रेमळ आहेत, विश्वास ठेवतात. स्पर्धा व बाजारपेठ यात ती टिकू शकत नाहीत, जगू शकत नाहीत. पण स्पर्धा व बाजारपेठच कायम राहणार नाही. वो सुबह कभी तो आयेगी प्रमाणे कधीतरी वेगळ्या मूल्यांची आपल्याला आठवण होईल, गरज जाणवेल. तेव्हासाठी, लाइफ सेव्हिंग मेडिसीन म्हणून का होईल, आदिवासी समाज व त्यांची संस्कृती सांभाळून ठेवा.

स्वातंत्र्याच्या ५० व्या वर्षी गडचिरोली जिल्ह्याचा विकास या संबंधात करण्यासारखा संकल्प म्हणजे या आदिवासीला आपण स्वातंत्र्य व स्वराज्य देअू. स्वर्गीय फागोजी व ापेक्षा अधिक चांगल्यारीतीने मी ते बोलून दाखवू शकत नाही. म्हणून त्यांचेच शब्द पुन्हा अुसने घेतो.

“भाई जी, हमने तो अभी देखा ही नही स्वराज को! सुना था बचपन में ही कि स्वराज आ गया, पर देखनेको नहीं मिला! आपने तो देखा ही होगा अुसे गुरु जी! कैसा हैं ? बूढा है, जवान हैं, काला है, गोरा है ? और कहाँ बैठा है यह स्वराज ? हम तो सब जगह ढूँढ मारे, चप्पा चप्पा छान लिया ... दफेदार का नाका, पुलिस की चौकी, बी.डी.ओ. का दफ्तर, कहाँ रह गया है अटक कर ? मुख्यमंत्री के दफ्तर में या संसद के बडियाँ घेरे मे ? हमारे गाँव में भी अुसे बुला लाओ न, सबको दर्शन हो जाय ... चवालीस साल बाद ही सही!”

-----xxxxx-----